## प्रेसनोट दिनांक १२/०३/२०१९

## चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सन २०१६ पासुन फरार आरोपीस कणकवली येथुन अटक

चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. ६४/२०१६, भा. द. वि. कम ४२०, ४०६, ३४ मधील फिर्यादी चंद्रकांत गणपत धुमाळ, रा. स.नं. ५६,/२०, माळवाडी, वडगांवशेरी, पुणे यांना आरोपी नामे (१) अभिजीत पाटील, रा. ओमश्री अपार्टमेंट, ए/४०४, फलॅ.नं. ११०, सेक्टर नंबर ११६, वाशी, नवी मुंबई (२) वनिता अभिजीत पाटील, रा. सदर यांनी त्यांचा काळभैरवनाथ ॲग्रो कॉन्सेंट प्रा.लि. नावाचा रिअल इस्टेटचा व्यवसाय असुन त्यामध्ये पैसे गुंतविल्यास एका वर्षात दुप्पट फायदा होईल असे आमिष दाखवुन, फिर्यादींना पैसे गूंतविणेस प्रोत्साहित करुन, त्यांची रु. ८,५०,०००/- ची फसवणुक केलेली आहे. बाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल होता. सन २०१६ पासुन सुमारे ३ वर्षे आरोपी फरार झालेले होते.

वरील नमुद गुन्हयामधील पाहीजे आरोपी अभिजीत पाटील, रा. ओमश्री अपार्टमेंट, ए/४०४, फलॅ.नं. ११०, सेक्टर नंबर ११६, वाशी, नवी मुंबई याचे मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर मोबाईल कंपनीकडुन प्राप्त करुन तपास करता, तो सध्या तराळे पेट्रोल पंपाजवळ, औदुंबरनगर, कणकवली, जिल्हा – सिंधुदुर्ग येथे राहात असलेची माहिती मिळालेली होती. त्याचे तपासकामी इकडील पोलीस ठाणेचे पोहवा. रविंद्र रोकडे, पोना. तुषार खराडे, पोना. प्रदिप सोनवणे यांनी त्याचा सिंधुदुर्ग येथे दिले पत्यावर जावुन शोध घेवुन, सदर गुन्हयामध्ये अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउनि. अंबरिश देखमुख हे करीत आहेत.

सदरची चांगली कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग श्री. सुनिल फुलारी सो, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्री अक्कानवरू सो, मा. सहा पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. श्री. शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कृष्णा इंदलकर, पो.नि.गुन्हे - राजेंद्र काळे, पोउनि. अंबरिश देखमुख, पोहवा. रविंद्र रोकडे, पोना. तुषार भिवरकर, पोना. प्रदिप सोनवणे यांनी केलेली आहे. सदर आरोपीसह घेण्यात आलेला फोटो यासोबत सादर करीत आहोत.